सुधारित प्रशासकीय मान्यता
अक्कलकुवा, जि. नंदुरबार येथे न्यायालयीन
इमारतीच्या बांधकामाबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग,
शासन निर्णय क्र.सीसीबी-१११८/प्र.क्र.२७/का-१३,
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक:- २७ मे,२०१९.

पहा :- १) विधि व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.सीसीबी १८९९/१३७२/(१०४)-का-१३, दि.१३ जून,२००७.
२) प्रबंधक (निरिक्षणे-२), उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई यांचे क्र.बी (डब्ल्यू) ६००१/१९९२/९/१७५, दि. ०३ जानेवारी,२०१८ चे पत्र.

प्रस्तावना:-

उपरोक्त संदर्भाधिन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये अक्कलकुवा, जि. नंदुरबार येथे न्यायालयीन इमारतीच्या बांधकामाकरीता रू.१,११,३४,०००/-इतक्या अंदाजित किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. परंतु बांधकामाच्या किंमतीत वाढ, दरसूचीतील वाढ व काळ्या मातीमुळे पायाच्या परिणामात वाढ झाल्याने प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी उपरोक्त संदर्भाधिन क्र.२ च्या पत्रान्वये सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्यानुसार सदरहू प्रस्तावास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

अक्कलकुवा, जि. नंदुरबार येथे न्यायालयीन इमारत बांधण्याबाबत रु.१,९२,०२,०००/- (रुपये एक कोटी ब्यान्नव लक्ष दोन हजार फक्त) इतक्या अंदाजित खर्चाच्या कामास खाली नमूद केलेल्या विगतवारीनुसार या शासन निर्णयाद्वारे सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. मूळ प्रशासकीय मान्यतेमधील ज्या कामांच्या किंमतीमध्ये सुधारणा झालेल्या आहेत, त्याच कामांचा तपशील व किंमत खालील विवरणपत्रातील रकाना क्र.४ मध्ये नमूद केलेली आहे.

अ.क्र.	तपशिल/बाब	मूळ प्रशासकीय मान्यता रक्कम रूपये	सुधारित प्रशासकीय मान्यता रक्कम रूपये
१	२	३	४
१	मूळ इमारत बांधकामाचा खर्च (आकस्मिक खर्चासह)	८४,३३,८६८/-	१,८३,९२,९१५/-
२	सरंक्षक भिंत	८,७१,९५७/-	---
३	अंतर्गत रस्ते	२,८३,४१३/-	---
४	विद्युत	८,०९,१६१/-	८,०९,१६१/-
५	पाणीपुरवठा	७,३५,६०१/-	---
	एकूण प्रकल्प खर्च रुपये -	**१,११,३४,०००/-**	**१,९२,०२,०७६/-**
	म्हणजेच एकूण रुपये -	**१,११,३४,०००/-**	**१,९२,०२,०००/-**

२. सदर सुधारित प्रशासकीय मान्यतेकरीता मूळ प्रशासकीय मान्यतेच्या आदेशात नमूद केलेल्या अटी लागू राहतील.

३. सदर न्यायालयीन इमारतीचे बांधकाम सुधारित प्रशासकीय मान्यता दिलेल्या रकमेस पूर्ण करण्यात यावे.

४. या प्रित्यर्थ होणारा खर्च "मागणी क्र.एच-८, ४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च-०१, कार्यालयीन इमारती-०५१, बांधकाम-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, (०३) न्यायदान (केंद्रपुरस्कृत योजना-राज्य हिस्सा), योजनांतर्गत, (०३) (०१) मोठी बांधकामे, ५३ मोठी बांधकामे (४०५९०६७२) व (२१) न्यायदान (केंद्रपुरस्कृत योजना- केंद्र हिस्सा), (२१) (०१) मोठी बांधकामे, ५३ मोठी बांधकामे (४०५९१२२२)" लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. मात्र, **अर्थसंकल्पात तरतूद केल्याशिवाय कामास सुरुवात करण्यात येऊ नये.**

५. हे आदेश सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-३४३/इमा-२, दि.०१.०८.२०१८ अनुसार नियोजन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक १६२/१४४३, दि.०५.१०.२०१८ व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक निरंक/व्यय-५, दि.१२.१०.२०१८ तसेच वित्त विभाग शासन निर्णय क्र:-विअप्र २०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम,भाग-२ दि.१७ एप्रिल,२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग पहिला, उपविभाग-पाच, अनुक्रमांक १, महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्र.१३४ अनुसार प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये संबंधित सक्षम प्राधिका-यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळांवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६०३११४००३१०१२ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

KAWADU
MAHADEO NIMJE

Digitally signed by KAWADU MAHADEO NIMJE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=d534ed26b170cf083fc036cec1eb71b53af888f9d1d19ab535e3731c0e6b6ccd, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=50937a061419ea12c61b63f5bef9bd56ffdb00d7531940b43c7e5e8c88731eac, ou=DESK 13, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=KAWADU MAHADEO NIMJE
Date: 2019.06.03 12:10:17 +05'30'

(क. म. निमजे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. सभापती, विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२. मा.अध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
३. मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद/विधानसभा ,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
४. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई,
५. प्रबंधक बी (डब्ल्यू) शाखा, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई,
६. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नंदुरबार,
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-दोन, नागपूर,
८. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक,
९. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, धुळे,

१०. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा,
(मूळ अंदाजपत्रक व आराखडे यांच्यासह)
११. उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग, अक्कलकुवा,
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, नंदुरबार,
१३. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-२), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
१४. वित्त विभाग/व्यय-५, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
१५. नियोजन विभाग,१४४३, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
१६. अपर आयुक्त व सदस्य सचिव, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ, नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, औरंगाबाद.
१७. कक्ष अधिकारी, का.७, ११ व १२,विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
१८. निवड नस्ती/संग्रहार्थ.